मूल्य ₹ १५/-

हसती दुनिया (मराठी)

अंक ०२ • वर्ष १७ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी - २०२०



हसती दुनिया (मराठी)

अंक ०२ • वर्ष १७ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी २०२०

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक) • सहसंपादक सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. झाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

देश	1 वर्ष	3 वर्ष	5 वर्ष	11 वर्ष
भारत/नेपाळ	₹ 150	₹ 400	₹ 700	₹ 1500
यू.के.	£ 15	£ 40	£ 70	£ 150
यूरोप	€ 20	€ 55	€ 95	€ 200
अमेरिका	$ 25	$ 70	$ 120	$ 250
कॅनडा/ऑस्ट्रेलिया	$ 30	$ 85	$ 140	$ 300

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९

स्तंभ

- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या १०
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २१
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३३
- सामान्य ज्ञान ४५
- चित्र काढा आणि रंग भरा ५०

चित्रकथा

- आजोबा १६
- किट्टी ३८



विशेष व प्रेरक प्रसंग

- शिवरायांचे नियोजन ०६
- थोर व्यक्तिमत्व - डॉ. भटनागर ०८
- तेजस्विनी - शीतल महाजन २३
- भ्रमंती - नेहरु तारांगण २८
- भ्रमंती - नेहरु विज्ञान केंद्र २९
- ओळखा पाहू ३०
- समर्थ दर्शन -भाग ६४ ३४
- विशेष माहिती ३६
- आपले जिल्हे - मुंबई शहर व उपनगर ४६
- विश्वजगत - टोनी राजा ४९

कथा

- दंडकारण्य ०५
- खरा स्पर्धक ११
- हेतू महत्त्वाचा १५
- अतिलोभाचा परिणाम २०
- शिष्य हेच गुरुचे सर्वस्व २४
- वैद्याची पारख ४२
- देवाचं अस्तित्व ४३

कविता

- वाटतं धुकं व्हावं ०९
- आम्ही बालक २७

अलौकिक देण

२३ फेब्रुवारी बाबा हरदेवसिंहजींचा जन्मदिवस ! बाबाजींना लहान मुलं खूप आवडत. मुलांना पाहून त्यांच्या चेहऱ्यावर मधुर हास्य विलसत असे. बाबाजी म्हणत, "मुलांचे बोल बोबडे असतील; पण ते नेहमी खरं बोलतात. मस्ती करतात; पण कटकारस्थान करत नाहीत.खरं तर एक चांगला मानव घडण्याची प्रक्रिया बालपणापासूनच सुरु होते. बालकांमध्ये ग्रहणशक्ती तीव्र असते. त्यामुळे बालकांना चांगले संस्कार लाभले नाहीत तर त्यांच्या मनाची कोमल कळी विषारी काट्यांचं रुप धारण करु शकते." मित्रांनो! यावरुन आपल्या लक्षात येईल, की बालवयात आपल्याला चांगल्या संस्कारांची किती आवश्यकता आहे!

बाबाजींनी नेहमी प्रेम आणि विशालतेचीच शिकवण दिली. एकदा एका घराच्या उद्घाटनासाठी बाबाजी गेले असताना एक छोटीशी बालिका बाबाजींना म्हणाली, "बाबाजी, आमचं घर इथून जवळच आहे. आमच्याही घरी या ना!" त्यावर बाबाजी हसून म्हणाले,"बाळ! हे पण तुझंच घर आहे." बाबाजींनी तिचं बालमन अगदी सहजपणे आपलेपणाने भरुन टाकले; परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती बालिका वीस वर्षांनी त्याच घरात सून म्हणून आली.

आपली मुलं शिकून खूप मोठ्या पदावर जावीत. त्यांनी भरपूर धनदौलत कमवावी असं प्रत्येक आई-वडिलांना वाटत असतं. एकदा बाबाजींच्या कक्षात दर्शनाला जाण्यापूर्वी एका बालकाला त्याच्या माता-पित्यांनी शिकवून ठेवलं, की जेव्हा तू बाबाजींना नमस्कार करशील तेव्हा त्यांना प्रार्थना कर - बाबाजी! मला इंजिनीअर, डॉक्टर किंवा खूप मोठा अधिकारी बनवा. बाबाजी तुला यापैकी काही तरी बनवतील. तो बालक जेव्हा बाबाजींच्या चरणी नमस्कार करु लागला, तेव्हा बाबाजी स्वत:च म्हणाले,"बेटा, मोठा झाल्यावर तुला काय व्हायचय?" त्यावर बालकाने हात जोडत उत्तर दिलं,"मला आपला उत्तम सेवादार व्हायचय." बालकाचं हे उत्तर ऐकून त्याची माता आश्चर्यचकीत झाली. मनात विचार करु लागली की मी तर त्याला वेगळंच शिकवलं होतं; पण त्याने किती सुंदर आशीर्वाद मागितला. बाबाजींच्या दैवी सानिध्यात मन आपोआपच निर्मळ आणि निर्लेप होत असे.

बालकांमध्ये आत्मविश्वास वाढावा म्हणून चार पाच वर्षाच्या बालकांनाही विशाल संत समागमात वक्ता मंचावर बोलण्याची संधी बाबाजींनी दिली. त्यांनी मातापित्यांना एकच संदेश दिला, की बालकांना एखाद्या विशिष्ट चौकटीत बसण्याऐवजी त्यांची प्रतिभाशक्ती जागृत करावी, त्यांच्यातील कला - गुणांना वाव देऊन ते विकसित करावेत.

खरंच! अशी अलौकिक देण देऊन त्यांनी आम्हाला आपल्या ऋणात कायमचं बांधून ठेवलं.

- राजेंद्र थोरात

पौराणिक कथा

दंडकारण्य

मनूचा पुत्र होता इक्ष्वाकू. व इक्ष्वाकूच्या अनेक पुत्रांपैकी एक पुत्र म्हणजे राजा दंड. तो बुध्दीने थोडा मठ्ठ होता. इक्ष्वाकूने त्याला मधुमंत नगरी व परिसराचा राजा केले. एकदा हा राजा चैत्रमासात शुक्राचार्यांच्या रमणीय आश्रम परिसरात आला. शुक्राचार्यांची जेष्ठ कन्या त्या वनप्रांतात हिंडत होती. ती अतिशय सुंदर होती. तिला पाहताच राजा त्या कन्येपाशी गेला व म्हणाला, "हे देवी! तू कुणाची कन्या आहेस? कुठून आलीस?"

ती कन्या उत्तरली, "राजेंद्रा, ज्या आश्रमपरिसरात तू विहार करीत आहेस, त्या शुक्राचार्यांची मी कन्या आहे. माझे नाव अरजा." त्यावर राजा म्हणाला, "हे सुदंरी, मला तुझ्याशी विवाह करायचा आहे. तरी तू माझा प्रस्ताव स्वीकारावा असे वाटते." त्यावर कन्या म्हणाली, "हे राजन, तू ज्या महात्म्याचा शिष्य आहेस त्यांची मी कन्या आहे. माझे पिता तुझे गुरु आहेत. या नात्याने मी तुझी गुरुभगिनी आहे. त्यामुळे तू माझ्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवणे योग्य नाही."

परंतु राजा दंड हट्टाला पेटला होता. तो म्हणाला,"तू अशीच रथात बसून माझ्यासोबत चल. राजदरबारात आपण थाटात विवाह करु." तेव्हा कन्या त्याला विनवणी करत म्हणाली,"हे

(पान ७ वर)

शिवरायांचे नियोजन

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती महाराष्ट्रात, भारतात व जगात जेथे जेथे शिवप्रेमी आहेत तेथे तेथे साजरी करुन शिवरायांचे स्मरण केले जाते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज जागतिक महापुरुषांमध्ये सर्वश्रेष्ठ ठरतात. एवढे च नव्हे तर जे जे महापुरुष होऊन गेले आणि जे जागतिक कीर्तीचे महापुरुष आज आहेत ते सर्व छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास करुनच आपले जीवनकार्य करीत असतात.

शिवरायांचे व्यवस्थापन

★प्रशासकीय कौशल्य :- शिवरायांचे आपल्या सर्व कामकाजावर बारकाईने लक्ष असे. राजांच्या गैरहजेरीतही प्रशासनात कोठेही खंड पडत नसे. उदा. सूर्यास्त झाला की गडांचे दरवाजे बंद केले जात असत. कर्तव्यात कसूर झाल्यास त्यास शिक्षा झालीच म्हणून समजा. त्यातही कसूर होत नसे.

★निर्णयक्षमता :- शिवाजी राजांची निर्णयक्षमता उच्च दर्जाची होती. उदा. आग्रा प्रसंगातून सुटका करुन घेताना निर्णयामध्ये कोठेही द्विधावस्था आवश्यक नव्हती म्हणून सर्वच सुखरुप सुटले.

★संवाद कौशल्य :- शिवाजी राजांनी प्रतापगडाच्या युध्दप्रसंगी गोपीनाथ पंताच्या मार्फत खानाशी संवाद साधला होता. राजे कसे भयभित झाले आहेत हे सतत गोपीनाथ पंत खानास सांगत. त्यास हरभऱ्याच्या झाडावर चढविण्यात त्यांनी यश संपादन केले होते. त्यामुळेच गाफील खानास राजे ठार करु शकले.

★संकल्पना कौशल्य :- हे राज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा. स्वत:चे राज्य नसून हे श्रींचे आहे. ही लोकांना आकर्षित करणारी संकल्पना होती. त्यामुळे लोक संघटित होऊन हेतू साध्य करु शकले.

★प्रजाहित दक्षता :- शिवरायांची सैनिकांना सतत ताकीद असे की प्रजेला कुठलाही त्रास होता कामा नये. सैनिकांनी प्रजेकडे साधे मीठही मागू नये. शेतातून कणसे तोडू नयेत. पोरीबाळी, लहान मुले, इतर धर्मियांची मंदिरे यांना धक्का पोहचू देऊ नये. इतर धर्मांच्या ग्रंथांचाही आदर करावा. धान्याच्या कोठाराजवळील समया, पलीते यांकडे लक्ष ठेवावे. समईची वात जर उंदराने नेली आणि धान्य कोठाराला आग लागली तर प्रजेला उपाशी राहावे लागेल त्याचे पाप तुम्हाला लागेल.

★कर्तव्य कठोर व न्यायी :- रांझे गावाच्या पाटलाने स्त्रियांशी केलेले असभ्य वर्तन ऐकून राजांनी त्याचे हातपाय तोडायची आज्ञा केली. त्यामुळे त्यांच्या राज्यात पोरीबाळी सुरक्षित होत्या.

फेंदाफितुरी करणारे, राजद्रोही यांना टकमक टोकावरुन कडेलोटाची किंवा हत्तीच्या पायी देण्याची शिक्षा फर्मावली जाई.

★मानवी कौशल्य :- प्रत्येकास ईश्वराने कोणते ना कोणते चांगले गुण कौशल्य दिले असते. उदा. हेरगिरीत बर्हिजी नाईकाचा राजांनी वापर करुन घेतला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला जीव संकटात टाकून स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज अष्टप्रधानांची निवड काटेकोरपणे कसोट्या लावून करत असत. एखाद्याने हयगय केल्यास त्यास तत्काळ बडतर्फ केले जात असे. वंशपरंपरागत निवड नसे. तसेच प्रधानांना इनामे, वतने किंवा जहागिऱ्या दिल्या जात नसत. रोख वेतन योग्य असेच दिले जात असे. वेतन पध्दती सुरु करणारा हा पहिला राजा म्हणून इतिहासामध्ये त्यांची नोंद आहे.

❖❖❖

दंडकारण्य (पान ५ वरुन)

राजेंद्रा, तुला जर माझ्याशी विवाह करायचा असेल तर धर्मशास्त्राप्रमाणे माझ्या पित्याला जाऊन भेट. ते जो निर्णय देतील तो मला मान्य असेल. पित्याच्या आज्ञेशिवाय मी कुठेही जाऊ शकत नाही."

राजा दंड अभिमानी होता. त्याला आपल्या सामर्थ्याचा गर्व होता. तिची विनवणी धुडकावून लावत त्याने बळजबरीने तिला रथात बसवले आणि रथ भरधाव नगरीकडे नेऊ लागला. त्या ऋषी कन्येने रथातून उडी टाकत तेथून पलायन केले. धडपडत, ठेचकाळत कशीबशी ती आश्रमात आली. तिची ती अवस्था पाहून शुक्राचार्यांना क्रोध अनावर झाला. राजा दंडाच्या मुजोरपणाला आता शासन झालेच पाहिजे. त्यांनी राजा दंडाला शाप दिला, "हे दुराचारी पापात्म्या, सात दिवसांच्या आत तू तुझ्या पुत्रांसह नष्ट होशील. धुळीचे प्रचंड लोट येऊन तुझे साम्राज्य त्यात गाडले जाईल." अशी भयानक शापवाणी त्यांच्या मुखावाटे बाहेर पडली. त्यांनी आपल्या सर्व आश्रमवासी मुनींना दंडाच्या राज्याबाहेर एका सुरक्षित ठिकाणी आश्रम उभारण्याची सूचना दिली आणि मुलीला म्हणाले, "मुली तू इथंच आश्रमात राहून ईश्वराचे ध्यान कर. तुझ्या सान्निध्यात येथील जीवांचे रक्षण होईल." आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे तिथेच आश्रमात राहिली. शुक्राचार्यांनी दुसऱ्या राज्यात जाऊन निवास केला. त्यांच्या शापवाणीमुळे दंडाच्या राज्यात धुळीचे प्रचंड लोट उसळले. राजाचा सर्व परिवार राज्यासहित नष्ट झाला तेव्हापासून पुढे तो भूभाग 'दंडकारण्य ' म्हणून ओळखला जाऊ लागला.

क्रमशः ...

पद्मविभूषित रसायन शास्त्रज्ञ
डॉ. भटनागर

डॉ. भटनागर यांनी १९२६ साली चुंबक रसायनावर संशोधन सुरु केले. त्यांनी चुंबकत्वाची काही रसायने आणि रासायनिक प्रक्रिया जाणण्यासाठी स्वतःचे उपकरण तयार केले. तसेच आर.एन.माथुर यांच्या मदतीने एक चुंबकीय तराजू तयार केला. तो भटनागर-माथुर इंटरफीयरेन्स बॅलेन्स नावाने प्रसिध्द झाला.

त्यांनी चुंबक रसायनाचा सिध्दांत व उपयुक्ततेवर इंग्रजी भाषेत सर्वप्रथम पुस्तक लिहिले. इमल्हान कोलायडस व औद्योगिक रसायन क्षेत्रातही त्यांचा मोलाचा वाटा होता. डॉ.भटनागर यांनी देशात अनेक शास्त्रीय संस्था निर्माण केल्या. त्यांनी मेन गंधहीन बनविण्याचा, रॉकेल शुध्द करुन ज्योत उंचावण्याचा व पेट्रोल शुध्द करण्याच्या प्रक्रियेचा शोध लावला.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भारत सरकारने त्यांना शास्त्रज्ञ व औद्योगिक संशोधनाचे डायरेक्टर नेमले. त्यांच्या देखरेखीखाली अनेक उपयुक्त शोध लावले गेले. त्यांच्या सल्ल्यावरून भारत सरकारने 'कौन्सिल ऑफ सायंटिफीक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च' निर्माण करुन देशभर राष्ट्रीय प्रयोगशाळांची साखळी स्थापन केली.

डॉ.भटनागर यांनी अनेक महत्त्वाचे शोध लावले. त्यांचा सर्वात महत्त्वाचा शोध चुंबकीय रसायनावर होता.

१९४१ साली ब्रिटीश सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली. ते १९४३ साली रॉयल सोसायटीचे सभासद झाले व १९५४ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित केले.

स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरुंच्या प्रोत्साहनाने डॉ.शांतीस्वरुप भटनागर यांनी अनेक तेलशोधक कार्यशाळा उघडल्या त्यामुळेच देशात टायटेनियम आणि जीरकोनियम सारख्या नव्या धातूंच्या उत्पादनांसाठी कारखाने उभे राहिले.

१ जानेवारी १९९५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ 'कौन्सिल ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' संस्था दरवर्षी डॉ.शांतिस्वरुप भटनागर पुरस्कार देत असते.

❖❖❖

कवीता

वाटतं धुकं व्हावं

किती छान असते पहाट जेव्हा दव पडलेलं असतं
सारं जग धूसर धूसर स्वप्नमय भासत असतं
उठून चिमणी पाखरं किलबिल करती झाडावर
बुलबुलही त्यांच्यामध्ये आळवतो अपुला स्वर

गूढ शांतताच जणू साद घालत असते मनी
नाचत नाचत वासुदेव गातो गोड अभंगवाणी
सर्व ठायी देवाचंच साम्राज्य असतं जणू
गोठ्यामध्ये आचळ भरती हंबरत असते धेनू

दव भरले सनई सूर झोंबत असतात मनी मनी
धुक्यामध्ये सृष्टी जणू दिसत असते आरसपानी
धुंदी भरलं वेगळंच जग नजरेसमोर दिसत असतं
थोडावेळ जणू काही ते गाव आपलं नसतं

अनोळखी त्या धुक्यामध्ये वाटतं जणू हरवून जावं
थोडा वेळ का होईना वाटतं धुकं धुकं व्हावं !

-प्रा. सौ. सुमती पवार
नाशिक

दादाला विचारु या..!

प्रश्न :- नामस्मरण हे अध्यात्मात अत्यंत आवश्यक असे साधन असताना निरंकारी भक्त कधी जपमाळ घेऊन नामस्मरण करताना दिसत नाही, असे का ?

उत्तर :- नामस्मरण याचा अर्थच असा आहे की ज्याचं आपण नाव घेतो त्याची सर्वकाळ आठवण ठेवणे. त्याच्या आठवणीत, म्हणजेच जाणिवेत राहून कर्म करणे. जशी एखादी माता आपल्या बाळाला झोपवते आणि आपली नित्यनैमित्तिक कामंसुध्दा करत असते. त्यावेळी बाळ झोपलेले आहे याची तिला सदैव जाणीव असते; परंतु त्यासाठी ती जपमाळ घेऊन बाळाच्या नावाचा जाप करत बसत नाही. ती भले कुणाशी तरी गप्पा गोष्टी करत असेल किंवा आणखी काही करत असेल परंतु लक्ष मात्र पूर्णपणे बाळाकडे असते. तसे ज्याने ईश्वराला आपल्या अंगसंग जाणलेले आहे आणि त्याचे नामस्मरण सद्गुरुने दिलेले आहे. त्याची आठवण म्हणजेच स्मरण होय. नामाचं तोंडाने वारंवार उच्चारण करणं म्हणजे रटन होईल. ते नामस्मरण नाही. निरंकारी भक्तांनी सर्वत्र सामावलेल्या ईश्वराला जाणलेलं असल्यामुळे त्यांना जपमाळ घेऊन रटन करण्याची गरज नाही.

जिज्ञासू व्यक्ती ज्यावेळी सद्गुरुकडे येऊन ईश्वराचा बोध प्राप्त करते त्यावेळी सद्गुरु त्याला आदेश देतात की या ईश्वराचा यापुढे आधार घ्यायचा आहे. याची आठवण राहावी म्हणून सद्गुरु जे नाम देतात त्या नामाच्या आधारे ईश्वराच्या अस्तित्वाची सदासर्वकाळ आठवण ठेवण्यासाठी त्या शब्दांचं किंवा नावाचं उच्चारण केलं जातं

प्रश्न :- संसार हा दु:खमय आहे असे म्हटले जाते, तरी संसाराचा त्याग करु नका असे संत का म्हणतात ?

उत्तर :- संसार हा दु:खमय त्यांच्यासाठी आहे ज्यांना खऱ्या सुखाची अनुभूती आली नाही. खरे सुख एकदा का प्राप्त झाले की ते कमी होत नाही किंवा दु:ख होत नाही.

खरंतर संसार दु:खमय नसून संसाराविषयी असलेली आसक्ती हीच दु:खाला कारणीभूत आहे. मनासारख्या घटना घडत गेल्या की मनाला सुख वाटते. त्या तशाच घडत राहाव्यात, त्याच सुविधा मिळत राहव्यात असा मनाचा संकल्प हाच दु:खदायी ठरतो. अनुकूल घटना घडली की सुखाची भ्रांती होते. पण प्रत्येकवेळी अपेक्षापूर्ती होईलच असे नाही. मग क्षणभरापूर्वी सुख देणारी गोष्ट दु:खदायी वाटते. म्हणून जेवढ्या अपेक्षा अधिक आसक्ती अधिक तितकं दु:ख अधिक! अपेक्षारहित किंवा संकल्परहित अवस्थेतच खऱ्या सुखाची अनुभूती येते; संसाराचा त्याग करण्यात नाही.

खरा स्पर्धक

राजू अभ्यासाबरोबरच उत्तम धावपटूही होता. राजू धावण्यात खूपच चपळ होता, शिवाय चांगले गुण व विनम्रता यामुळे राजू शिक्षकांमध्येही प्रिय होता. धावण्याच्या शर्यतीत राजूला हरविणे दुसऱ्या स्पर्धकाला आव्हानच असते.

एकदा शाळेत वार्षिक महोत्सव होता. यात धावण्याच्या स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. इतर ठिकाणाहूनही अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्राध्यापक प्रत्येक विद्यार्थ्याशी परिचय करुन घेत होते. त्यावेळी दुसऱ्या एका शाळेतील पिंटू नावाचा एक विद्यार्थी प्रध्यापकांना मोठ्या विश्वासाने म्हणाला, "सर मी राजूपेक्षाही जलद गतीनं धावू शकतो. राजूला पराजित करणं माझं उद्दिष्ट आहे." प्रध्यापक मनातल्या मनात हसले आणि पुढे गेले कारण त्यांना माहीत होतं, की राजूला हरवणं इतकं सोप्पं नाही. स्पर्धा सुरु झाली. धावण्याच्या सर्व फेऱ्या झाल्या. शेवटच्या

(पान १३ वर)



विचारपुष्प

संत समागम हे आत्मा आणि परमात्म्याचं मिलन आहे. आत्म्याचं परमात्म्याशी मिलन कसं होईल ? हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा ब्रह्मज्ञान प्राप्त होईल, तेव्हाच आपल्याला जाणीव होते की आपली वास्तविक ओळख काय आहे ? ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर अहंकार समाप्त होणं गरजेचं आहे, नाहीतर ते मनामध्ये टिकणे अशक्य आहे. स्वअस्तित्वाला मिटवून केलेली भक्ती सार्थक असते."

सद्गुरु माताजी म्हणाल्या, 'मिशनच्या ९०वर्षांच्या प्रवासाचं वर्णन होत आहे. हा सनातन काळापासूनचा संदेश आहे, की माणसाने मनुष्य जन्मामध्ये आपली ओळख करुन घ्यावी. आपण आपले आत्मचिंतन करावे की आपण रंग, वर्ण, भाषा, संस्कृती या आधारावर भेदभाव करतो आहोत का ?'

त्या पुढे म्हणाल्या, की 'जेव्हा आपण ब्रह्मज्ञान व्यावहारिक जीवनात धारण करतो तेव्हा आपला प्रत्येक क्षण पूजा बनतो. जेव्हा प्रत्येक क्षणाला निराकाराचे ध्यान करतो तेव्हा प्रत्येक क्षण धन्यवादाच्या भावनेने भरुन जातो. सांसारिक सुख-दु:ख तर तोपर्यंतच आपल्या बरोबर आहेत जोपर्यंत हे शरीर आहे, परंतु आनंदाची अवस्था जी आहे ती निराकाराशी जोडूनच प्राप्त होते.'

जगतमाता बुध्दवंतीजींच्या जीवनावरील एक पुस्तक वाचत होते, त्याच विचारांचा एक भाग आपल्या समोर मांडू इच्छिते, एकदा बुध्दवंतीजींकडे एक भगिनी आली आणि म्हणाली, की माझ्या मुलाची तब्येत ठीक नाही,

त्याला बाबाजींचे चरणामृत द्यायचे आहे. माताजींनी तिला समजावले, की तुमच्या घरात सर्वच ब्रह्मज्ञानी आहेत. म्हणून हा अंधविश्वास (भ्रम) ठेवू नका की याला केवळ बाबाजींचेच चरणामृत ठीक करु शकते. ज्यात ब्रह्मज्ञानाचा वास आहे अशा कोणत्याही शरीराचे चरणामृत घेऊन पाजले तरी तुमच्या मनाचे भाव पूर्ण होतील, त्यासाठी इतक्या लांब भवनपर्यंत येण्याची आवश्यकता नव्हती. मग त्यांनी बाबा अवतारसिंहजींचे विचार त्या भगिनीला सांगितले. ते वाचून दाखवते - "ज्याचा गुरु पूर्ण असतो त्याचे संतही पूर्ण असतात. म्हणूनच मी म्हणतो, की माझ्याकडे येण्यापेक्षा आपल्या इच्छा या संतांकडून पूर्ण करुन घ्या. सांसारिक पदार्थ हवे असतील किंवा मग सांसारिक दु:ख दूर करायचे असेल तरीही या संतांचे चरण धुऊन प्यावेत, सर्व कार्य ठीक होतील."

त्यावेळी ते सद्गुरु रुपात असून हे दाखवू इच्छित नव्हते, की ते स्वत: सद्गुरु आहेत, श्रेष्ठ आहेत. त्यांनी हा भाव दृढ केला की साधसंगतच प्रधान आहे, महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी आपल्या शक्तीही सत्संगला प्रदान केल्या आणि असं म्हणाले, की माझ्याही शरीराला तितके महत्त्व नाही जितके साधसंगतमध्ये येणाऱ्या महापुरुषांना आहे. केवळ चरणामृताचा विषय नाही तर श्रद्धेचा विषय आहे. एखाद्या ब्रह्मज्ञानी महापुरुषाचे चरणामृत पाजले तरी कार्य तेवढेच होणार आहे, जितके सद्गुरुच्या चरणांपासून बनवलेल्या चरणामृताने होणार आहे.

❖❖❖

खरा स्पर्धक (पान ११ वरुन)

फेरीत फक्त राजू आणि पिंटू हे दोघंच मुख्य प्रतिस्पर्धी उरले.

स्पर्धा पुन्हा सुरु झाली. दोघं धावत होते. मुलं राजूला प्रोत्साहन देत होते. अचानक राजूच्या धावण्याचा वेग मंदावला. पिंटू पहिला आला. राजू पराजित झाला. सारी मुलं, शिक्षक, प्रेक्षक हिरमुसले. राजू प्रथमच पराजित झाला होता. प्राध्यापकांना व शिक्षकांना राजू हारला आहे यावर विश्वासच बसत नव्हता. त्यांनी त्याला एकांतात बोलवून घेतलं. अनेकांनी त्याला विचारलं पण तो काही सांगायला तयार होईना. शेवटी प्राध्यापकांनी त्याच्यावर दबाव टाकला तेव्हा त्याने सांगितले, "सर पिंटूला मी बाहेर त्याच्या मित्रांबरोबर बोलताना ऐकलं की त्याची परिस्थिती खूप गरिबीची आहे. या पुरस्काराच्या रकमेतून त्याची फी तो भरणार आहे. मी या गोष्टीची अनेक मित्रांकडून खात्री केली. सर, माझ्या हरण्यानं जर कुणाचं आयुष्याचं कल्याण होत असेल तर मी कायम हरायला तयार आहे. सर, माफ करा यामुळे आपल्या सर्वांचा अपेक्षाभंग झाला; पण ह्यातून एका विद्यार्थ्याचं आयुष्य उभं राहील याचं मला समाधान आहे." या त्याच्या बोलण्याने सर्वच उपस्थित असणाऱ्यांनी टाळ्या वाजवल्या व प्राध्यापकांनी राजूचं एक 'गुणवान विद्यार्थी' म्हणून अभिनंदन केलं.

- श्री.नितीन ल. घुरुप

❖❖❖

शब्द कोडे

१८७

○ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)



उभे शब्द

०१. पांडवांची पत्नी, पांचालीचे नाव

०२. डायनासोरसचे अवशेष भारतात कोणत्या नदीच्या काठी सापडले ?

०३. कोकणातील फळ/सुका मेवा

०४. मातीचा किंवा धुळीचा कण

०६. साल्हेर हे महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे ?

०७. युध्द, लढाई

०८. ....., वाचा, कर्मणा म्हणजे मनाने, वाचेने आणि कर्माने

१०. राष्ट्रीय विज्ञान दिवस फेब्रुवारीच्या ..... तारखेला साजरा करतात.

११. इराकची राजधानी

१२. धार्मिक ठिकाणी वाटला जातो

१३. सात बेटांचे शहर असे या शहराला म्हणतात

आडवे शब्द

०२. सोळा हजार मुलींची सुटका करण्यासाठी श्रीकृष्णांने ..... या राक्षसाचा वध केला

०५. निरंकारी जगतातील एक श्रेष्ठ मराठी गीतकार, दीनांचा दास

०९. हिराकूड धरण कोणत्या नदीवर आहे ?

१०. कोणत्या मुघल सम्राटाच्या काळात बीरबल होऊन गेले ?

१४. भारतीय चित्रपटसृष्टीत दिला जाणारा सर्वोत्कृष्ट पुरस्कार ..... फाळकेच्या नावे दिला जातो

१५. 'रसमलाई', 'युरोप', 'उदक' या शब्दांचा द्वितीय अक्षरापासून बनणाऱ्या एक वाद्ययंत्राचे नाव

उत्तरे इतरत्र

हेतू महत्त्वाचा

एकदा तेनालीराम आपल्या पत्नीसोबत एका लग्नसोहळ्यासाठी निघाला होता. पावसाचे दिवस असल्याने रस्त्यावरील खाचखळग्यात पाणी साचले होते. पत्नीने नवीन साडी, दागदागिने अंगावर परिधान केले होते. त्यामुळे ती जपून चालत होती. अचानक पाठीमागून एक बैलगाडी वेगात येत असलेली पाहून तेनालीने आपल्या पत्नीला रस्त्याच्या कडेला खेचले. बैलगाडीच्या धक्क्यापासून ती वाचली. बैलगाडी भरधाव निघून गेली. पण रस्त्याच्या कडेला पत्नीला ओढताना त्या दोघांचा तोल गेला आणि ते दोघेही खड्ड्यात पडले. खड्ड्यातील चिखलाने दोघांचेही कपडे खराब झाले. पतीने आपल्याला रस्त्याच्या कडेला का खेचले याची तिला कल्पना नसल्याने ती भयंकर रागावली. "हे काय केलं तुम्ही? माझी एवढी महागडी साडी खराब झाली. एवढा चांगला साज शृंगार केलेला वाया गेला. आता मी लग्न समारंभाला कशी जाऊ?" तेनालीराम तिला समजावत म्हणाला, "हे बघ या निमित्ताने तुला आपण नवीन साडी घेऊ, चल आता घरी जाऊन स्वच्छ आंघोळ करू आणि पुन्हा तयारी करुन

(पान २५ वर)

आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा

१

आजोबा शांतपणे विचार करत होते, की आज मुलं कुठं बरं गेली ?

२

नमस्ते आजोबा

मुलांनो, कुठं होतात एवढा वेळ ? आणि एवढा गोंधळ कसला ?

३

आम्ही सर्वांनी मिळून पार्टी केली. थोडे पैसे कमी पडले; पण दुकानावरुन उधार सामान आणलं.

आजोबा, गोष्ट सांगा ना!

४

हे ऐकून आजोबा खूश झाले

५
मुलांनो, आज मी तुम्हाला खलिफाची गोष्ट सांगतो.
६
खलिफा दिवसभर दरबारातील कामकाज करत असे. संध्याकाळी कामाचा मोबदला म्हणजे पगार म्हणून खजिन्यातून तीन मोहरा घेऊन जाई. खरंतर घरखर्चासाठी तेवढ्या मोहरा कमीच पडत.
७
खलिफा अतिशय प्रामाणिक आणि न्यायी होता. शाही खजिन्यातील ठराविकच पगार त्याने आपल्यासाठी निश्चित केला होता.
८
एके दिवशी खलिफाची बेगम(पत्नी) म्हणाली, तुम्ही तीन दिवसांचा पगार आगावू मागून घ्या म्हणजे ईदच्या सणाला मुलांना नवीन कपडे घेता येतील.

९
तू म्हणतेस ते बरोबर आहे
१०
परंतु उद्या जर मी जिवंत राहिलो नाही तर ते कर्ज कसं फेडणार ?
११
तू खुदाकडे जाऊन मी तीन दिवस जिवंत राहीन असं लिहून आणशील तर मी पगार उधार घेतो.
१२
बेगमकडे या प्रश्नाचं काहीच उत्तर नव्हतं.


१३
मुलांनो पार्टी करणं, आनंद साजरा करणं ठीक आहे; पण त्यासाठी आपल्या खिशात असतील तेवढाच खर्च करावा, उधारी करुन नाही.
१४
यापुढे असं काहीही करु नका, की तुम्हाला मान खाली घालावी लागेल.
१५
सर्व मुलांनी आता प्रण करा, की दहा रुपयांमधून आठ रुपये खर्च करु आणि दोन रुपये शिल्लक ठेवू, म्हणजे गरज पडेल तेव्हा ते उपयोगी पडू शकतील.
१६
आजोबा, आम्हाला क्षमा करा, यापुढे आम्ही असं कधी वागणार नाही .



कथा

अतिलोभाचा परिणाम

शामल नगरीचा राजा दयाळसिंह हा नावाप्रमाणेच दयाळू होता. आपल्या प्रजेची तो आपल्या मुलांप्रमाणे काळजी घेत असे. त्याच्या राज्यात कधीही कसलीच टंचाई नसायची. त्यामुळे राज्यात सुख-शांति नांदत होती. चोऱ्यामाऱ्या दरोडे असे प्रकार कधीही घडत नसत.

परंतु सतत दोन वर्षे पाऊस न झाल्यामुळे नगरातील लोकांची उपासमारीची वेळ आली. प्रधान व सेनापती यांनी ही सर्व गोष्ट राजाच्या नजरेला आणून दिली. राजाने ताबोडतोब आपली धान्याची कोठारं लोकांसाठी खुली केली. परंतु राज्यातला मोठा व्यापारी लालाने ते सर्व धान्य आपल्याकडे घेतले आणि लोकांना जास्त किंमत घेऊन विकत होता.

लोकांनी राजाकडे तक्रार केली. राजाने सेनापतीला छापा मारुन सारे धान्य जप्त करायला सांगितले. हे लालाला अगोदरच समजले त्यामुळे त्याने गोदामातील सारे धान्य नदी जवळच्या एका पडक्या वाड्यात लपवून ठेवले.

सेनापती काही शिपायांसह लालाच्या

(पान २२ वर)

बदाम

आयुर्वेद म्हणतो की, मानवी शरीरातील रोगनिर्मिती वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन बिघडल्याने आणि विकृतीतून होते. काही औषधे वातावर गुणकारी असतात. काही कफावर तर काही पित्तावर गुणकारी असतात. बदाम हे औषध असे आहे की जे तीनही दोषांवर गुणकारी आहे. त्यामुळे बदाम हे औषध म्हणून कुणीही वापरावे!

मेंदूचा अशक्तपणा आणि डोळ्यांचा वाढणारा नंबर कमी करण्यासाठी बदामाचा औषधी उपयोग आहे. बदामामुळे स्मरणशक्ती वाढते आणि डोळ्यांना दृष्टी येते. बदाम शीतल आणि पौष्टिक आहेत. क्षयरोग्यांसाठी कॉड माशाच्या लिव्हरपासून तयार केलेले कॉडलिव्हर ऑईल उपयुक्त असते. कॉडलिव्हर ऑईलसारखेच कार्य बदामाच्या तेलाचेही आहे!

बदाममिश्रित दूध प्या!

मेंदूत ठणका लागणे, डोकेदुखी, विसराळूपणा, कोणत्याही प्रकारची मेंदूची दुर्बलता अशां कोणत्याही विकारात बदाममिश्रित दूध अतिशय लाभदायक आहे. रात्री चार ते पाच बदाम भिजत घालावेत. सकाळी त्यांची साले काढावीत. त्यानंतर ते वाटा आणि कपभर दुधात टाकून उकळवावे. जास्त उकळू नये. बदामाची खीर रुचकर, पाचक आणि उत्तेजक असते!

मस्तकशूळ आणि डोकेदुखीवर बदामाच्या तेलाचे मालीश करावे. डोके शांत होते. बदाम आणि कापूर दुधात उगाळून त्याचा लेप कपाळावर लावल्यास डोकेदुखी आणि मस्तकशूळ थांबतो. बदामाचे तेल केशवर्धकही आहे!

लहान असो, मोठा असो, सर्वानाच लाडू आवडतात. बदामाचे पौष्टिक लाडू बनविण्यासाठी रीत पुढीलप्रमाणे आहे!

८ तोळे वाटलेले बदाम, २० तोळे खवा, १२० तोळे साखर, ४० तोळे तूप, ४ तोळे कमळ काकडीचा मगज, प्रत्येकी २ तोळे वेलची, तज, तमालपत्र व नागकेशर, प्रत्येकी एक तोळा लवंग, वासकपूर, जायफळ, जायपत्री व केशर असे साहित्य घ्यावे!

वाटलेले बदाम व खवा वेगवेगळे तुपात भाजावेत, त्यानंतर साखरेचा पाक करून त्यात सर्व साहित्य बारीक करून टाकावे. नंतर बदाम आणि खवा घालून लहान लहान लाडू करावेत. रोज सकाळी एक लाडू दुधासोबत खावा. तापानंतर आलेला अशक्तपणा त्वरित दूर होतो. शक्ती येते. स्मरणशक्ती वाढते. सर्वच फायदे मिळतात!

बदामाचे दंतमंजन!

बदामाच्या साली जाळून दंतमंजन तयार करता येते . या सालीच्या राखेत मीठ व तुरटीची वस्त्रगाळ पूड टाका आणि एकजीव करा. या मंजनाने दात नियमित घासल्यास दातांना मोत्याचा रंग प्राप्त होती. याच वेळी दातांना मजबुतीही येते!

स्मरणशक्तीसाठी बदामाचा उपयोग!

वयोमानाप्रमाणे बदाम २ ते ४ घ्यावेत. ते रात्री पाण्यात भिजत घालावेत. सकाळी उठल्यानंतर त्याच्या साली काढाव्यात आणि त्याच पाण्यात ते कुस्करून ते पाणी प्यावे. सोबत एक मिरी दाढेखाली चावून खावी किंवा बदाम व मिरी दोन्ही चावून खाऊन वर बदाम भिजविलेले पाणी प्यावे. मेंदूला व नेत्रांना पुष्ट करणारा हा प्रयोग आहे!

अर्धशिशी, डोकेदुखी व बदाम!

अर्धशिशीचा विकार असणाऱ्यांनी पहाटे ही खीर खाल्यास तीन ते चार दिवसांत अर्धशिशी दूर होते!

बदाम व कापूर दुधात उगाळून त्याचा लेप डोक्यावर लावल्यास डोकेदुखी पळते व बदाम तेलाच्या मालीशने डोके शांत राहते!

❖❖❖

अतिलोभाचा परिणाम (पान २० वरुन)

गोदामात धान्य शोधायला गेला; पण त्याला तिथे काहीच सापडले नाही. आपल्याला चुकीची बातमी मिळाली असे मानून सेनापती परत गेला. योगायोगाने काही दिवसा नंतर अचानक मुसळधार पाऊस पडू लागला. नदीला पूर आला. नदीचे पाणी लालाने धान्य लपवून ठेवलेल्या गोदामात शिरले. सारे धान्य भिजून गेले.

इकडे राजाने पुन्हा खजिना उघडला. तसेच नागरिकांना व व्यापाऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा हुकूम दिला. नुकसानीचा अंदाज घेण्याची जबाबदारी प्रधान व सेनापतीवर सोपवण्यात आली.

सारे नागरिक व व्यापारी नुकसानीची खरीखुरी माहिती देऊन भरपाई मिळवू लागले. लालाही तिथे गेला व म्हणाला, "सेनापती, माझं खूप सारं धान्य खराब झालं आहे. मला भरपाई द्या." सेनापतीने लालाला पाहाताक्षणी ओळखले. तो प्रधानाला म्हणाला, "हा खोटं बोलतोय. आम्ही याच्या गोदामावर छापा टाकला तेव्हा तेथे धान्याचा कणही नव्हता."

लालाचा चेहरा पडला. प्रधान रागाने म्हणाले, "अशा आणीबाणीच्या वेळी हा खोटं बोलून राजाला फसवू पाहतो आहे. याला चाबकाचे फटके मारुन येथून हाकलून द्या." लालाला फटके मारुन हाकलण्यात आले. तो दु:खी मनाने घरी परतताना विचार करु लागला, मी जर रास्त किंमतीत धान्य विकले असते तर सारे धान्य विकलेही गेले असते आणि संकटकाळी प्रजेला मदत केल्याबद्दल राजदरबारात मानही मिळाला असता; पण या लोभापायी आता काहीच हाती आले नाही.

❖❖❖

शीतल महाजन

'जय भवानी, जय शिवाजी...' म्हणताना प्रत्येक मराठी माणसाच्या अंगावर शहारा येतोच. हीच भावना जपत मराठमोळ्या शीतल महाजन यांनी शिवजयंती दिनी इजिप्तमधील कैरो येथे नऊवारी साडी नेसून स्कायडायाव्हिंग केले. मंगळवारी सकाळी जगभरातील स्कायडायव्हर्ससमोर शिवरायांना अभिवादन करणारा झेंडा अभिमानाने इजिप्तच्या आकाशामध्ये फडकवला.

शीतलने आतापर्यंत दोन्ही ध्रुवांवर पॅराशूट जम्पिंग केले आहे. तिने ५०० हून अधिक वेळापॅराजम्पिंग केले आहे. तिच्या या कामगिरीला आता नव्या विक्रमाची जोड मिळाली आहे. जगातील सात आश्चर्यांपैकी एक मानल्या गेलेल्या इजिप्तच्या पिरॅमिडजवळ स्कायडायाव्हिंग करण्याचा मान तिला मिळाला आहे. शीतलने स्थानिक वेळेनुसार सकाळी दहाच्या सुमारास स्कायडायाव्हिंग केले. यावेळी तीने नऊवारी साडी नेसली होती. आकाशात १५ हजार फूट उंचीवरुन स्कायडायाव्हिंग करताना तिने शिवरायांना अभिवादन करणारा झेंडा फडकवला आणि तिथून पिरॅमिडच्या पायथ्याशी लँडिंग केले. तिच्यासोबतच जगभरातील ३५ देशांमधील १५६ स्कायडायव्हरनीही पिरॅमिडजवळ स्कायडायाव्हिंग केले.

इजिप्तमध्ये पिरॅमिडवरुन स्कायडायाव्हिंग करण्याच्या योजनेवर शीतल गेल्या दोन-तीन महिन्यांपासून काम करत होती. सहा खंडांमध्ये स्कायडायाव्हिंग केल्याबद्दल इजिप्तमध्ये सुवर्णपदक मिळाल्यापासून याबाबात विचार सुरु होता. प्रारंभी १४ ते १६ फेब्रुवारीदरम्यान ही उडी मारण्याचे नियोजन होते. मात्र वातावरण अनुकूल नसल्याने हा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला आणि १९ फेब्रुवारीला शिवजंयतीच्या दिवशीच ही उडी प्रत्यक्षात आली, हा अपूर्व योगायोग होता असे शीतल महाजन म्हणाली.

'हा संपूर्ण कार्यक्रम इजिप्त सरकार आणि लष्कराच्या मदतीने आयोजित करण्यात आला. हा महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा क्षण आहे. हा दिवस मराठी बाणा मिरवण्याचा आहे' अशा शब्दांमध्ये इजिप्तमधून शीतलने आपल्या भावना व्यक्त केल्या. नऊवारी नेसून ही उडी मारताना मी भारतीय असल्याचा मला प्रत्येक क्षणी अभिमान वाटत होता, असे ती म्हणाली.

❖❖❖



शिष्य हेच गुरुचे सर्वस्व

सिकंदर एक महान तत्त्वज्ञ गुरु ॲरिस्टॉटल यांचा शिष्य होता. तो गुरुकडून नीतिशास्त्र, प्रगतीचे ज्ञान आणि जीवनोपयोगी विद्या शिकत होता. गुरु ॲरिस्टॉटल यांनी सिकंदरमधील पराक्रम आणि महत्त्वाकांक्षा पारखली होती.

एकदा तरुण सिकंदर एका रुपवान तरुणीच्या जाळ्यात अडकला. तो आपल्या गुरुंकडील कामे कशीबशी उरकून त्या तरुणीला भेटायला जात असे. पूर्वीसारखे तो गुरुदेवांचे काम मन लावून करीत नव्हता. हळूहळू त्याची बोलण्याची पध्दतही बदलत चालली होती. गुरु ॲरिस्टॉटल यांना जेव्हा त्याचे कारण समजले तेव्हा त्यांना फार दु:ख झाले. सिकंदरला गैरमार्गावरुन योग्य मार्गावर आणणे त्याच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते. त्यांनी अनेकदा निरनिराळी उदाहरणे देऊन त्याला समजावण्याचा प्रयत्न केला;पण सिकंदर सारे एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत होता. गुरु ॲरिस्टॉटल यांनी ओळखले की, असे सांगून समजावून सिकंदरला त्या तरुणीच्या जाळ्यातून सोडवणे कठीण आहे. सिकंदर कधी त्या

तरुणीकडे जातो, तिथे किती वेळ थांबतो ही माहिती गुरु ॲरिस्टॉटल यांनी मिळवली. एकदा सिकंदर तिथे जाण्यापूर्वीच गुरुदेव त्या तरुणीच्या घरी गेले. तरुणीने गुरुदेवांना ओळखले. तिने विचारले, "आपण मला लिहा-वाचायला शिकवायला आलात का?"

ॲरिस्टॉटल म्हणाले, "हे सुंदरी, तुझ्या सौंदर्याची कीर्ती ऐकून मी इथं आलोय, मला तुझ्याशी विवाह करायचा आहे." तरुणी लाडीकपणे म्हणाली, "माझी एक अट आहे, तुम्ही माझा घोडा व्हा आणि दोन तास मला पाठीवर बसवून फिरवा." तरुणी म्हणाली आणि ॲरिस्टॉटल तयार झाले. तरुणीला पाठीवर बसवून ते रांगू लागले. त्याचवेळी सिकंदर तिथे आला. गुरुदेवांना एका तरुणीला पाठीवर बसवून रांगताना तो डोळे विस्फारून पाहातच राहिला. नंतर एका कोपऱ्यात लपून पाहू लागला. गुरुदेवाने त्याला लपलेले पाहिले होते. ते त्या कोपऱ्यात गेले आणि पटकन उठून उभे राहिले. तरुणी खाली पडली.

नंतर गुरुदेव कडाडत्या आवाजात म्हणाले, "सिकंदर असे लपून का पाहातोस? बाहेर ये आणि ही तरुणी माझ्यासारख्या ज्ञानी माणसाची कशी दुर्दशा करीत आहे हे पाहा आणि त्यावरुन तुझी काय दशा होईल हे तूच ओळख." गुरुदेवांचे बोलणे ऐकून सिकंदरचे डोळे उघडले. तो अपराध्यासारखा मान खाली घालून दोन्ही हात जोडून उभा होता. त्याने प्रतिज्ञा केली की, पुन्हा कधीही गैर मार्गाने जाणार नाही.

❖❖❖

हेतू महत्त्वाचा

(पान १५ वरुन)

येऊ."

तेनालीच्या समजवण्याचा काही उपयोग झाला नाही. रागाच्या भरात तिचे तेनालीला दोष देणे सुरुच होते. तिची एवढी आगपाखड सुरु असूनही तेनाली मात्र शांतच होता. तेनालीचा नोकर ही सारी गंमत पाहात होता. न राहवून त्याने तेनालीला विचारले, "मालक तुम्ही मालकीणबाईंचा जीव वाचवला, तरी त्या तुम्हालाच दोष देत आहेत. तुम्ही जे काही केलंत ते त्यांच्या भल्यासाठीच केलं, हे त्यांना सांगत का नाही?"

तेनालीराम म्हणाला, "ती आता क्रोधाच्या आधीन झालेली आहे. ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाही. जाऊ दे काहीही झालं तरी ती सुखरुप असल्याबद्दल मला देवाचे आभारच मानायला पाहिजे."

मित्रांनो, आपल्याही जीवनात असे प्रसंग येत असतात. अनेकदा आपण चांगले करायला जातो, पण त्याचा परिणाम वाईटच होतो. अशावेळी स्वत:ला किंवा परिस्थितीला दोष न देता शांतपणे हाच विचार करावा, की आपला हेतू तर चांगलाच होता. कुणाचं नुकसान व्हावं यासाठी आपण काही केलं नाही तर नाराज कशासाठी व्हायचं, नाही का?

-रंजना भांगरे
मुलुंड

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

आराध्या सुर्वे

अगम पाटील

अंबर जाधव

अंश मोकाशी

अश्रीत गावडे

निधी कदम

कोमल चव्हाण

प्रिशा भानुशाली

वेदान सोनुने

स्वरा पवार

वेदिका सोनुने

विश्वास धायगुडे

अयान हुमणे

असीम सावळकर

अनुराग हुमणे

ईश्वरी गजरे

रुणाली येरुडकर

समर्थ शेंडे

साक्षी गजरे

सिध्दी जाधव

आम्ही बालक

आम्ही बालक सद्‌गुरु पालक
हीच असे चरणी अरदास
आमचे बनावे जीवन खास ।। धृ।।

आम्ही वयाने लहान असलो
तुमच्या संगती येऊन बसलो
तुमच्या कृपेने आशीर्वादाने लागू द्या सत्संगाची आस ।।१।।

सत्संग सेवा आणि स्मरण
घडेल याने आमुचे जीवन
ज्ञानापरी हे कर्म करावे नित्य असावा प्रयास ।।२।।

गुरु वचनावर चालत राहू
प्रेमाने आपण बोलत राहू
संत जनांची सेवा घडावी होऊन त्यांचा दास ।।३।।

नेहमी संताचा संग घडावा
भक्तीचा आम्हा छंद जडावा
हीच विनंती करतो पायी तुमचा दास प्रकाश ।।४।।

-प्रकाश तुकाराम व्हावळकर
कराड, सातारा.

नेहरू तारांगण

वरळीत नेहरू तारांगणाची वास्तू आपलं लक्ष सहज वेधून घेते. आबालवृद्धांमध्ये खगोलशास्त्राविषयी गोडी निर्माण व्हावी, या मुख्य हेतूने ३ मार्च, १९७७ या दिवशी तारांगणाची सुरुवात झाली. ज्ञान आणि मनोरंजन या दोन्हींसाठी तारांगणाला भेट द्यायलाच हवी. मुख्य म्हणजे इथे मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये अवकाश दर्शनाचे कार्यक्रम होतात. अवकाशातले तारे, तारका, नक्षत्र, ग्रहगोल हे आपल्याला रिलेक्सिंग चेअरमध्ये आरामात बसून पाहता येतात. सारं आकाश अक्षरश: कवेत घेता येतं आपल्याला! तारांगण मुलांसाठी खगोलकाव्य, खगोलप्रश्नमंजुषा असे कार्यक्रमही आयोजित करतं. सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहणाचा अभ्यासही इथं करता येतो. तारांगण दर्शनाच्या कार्यक्रमांसाठी ऑनलाइन बुकिंगची सुविधा आहे. याशिवाय मुलांना आकर्षून घेण्यासाठी खगोलशास्त्राव्यतिरिक्त कार्यक्रमही आयोजित करण्यास तारांगणने सुरुवात केली आहे. यामध्ये कथक कार्यशाळा, नाट्य शिबिर यासह सांस्कृतिक कार्यक्रमही आता आयोजित केले जातात.

अधिक माहितीसाठी संपर्क : २४९२०५१०
managernp@nehru-centre.org

❖❖❖

नेहरू विज्ञान केंद्र

देशातलं सर्वात मोठं विज्ञान केंद्र वरळी येथे आहे. आठ एकर परिसरावर बांधलेलं हे विज्ञान केंद्र १९७७ मध्ये सुरू झालं. याला पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचं नाव देण्यात आलं. सुरुवातीला हे विज्ञान केंद्र जनतेसाठी खुलं नव्हतं. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या आग्रहामुळे ११ नोव्हेंबर, १९८५ या दिवशी हे विज्ञान केंद्र जनतेसाठी खुलं झालं. इथं देशातील विविध प्रजातींच्या ५००हून अधिक वनस्पतीची लागवड केली आहे. ऊर्जा ध्वनी, गती, मेकेंनिक्स, मालवाहतूक अशा विविध विषयांवर इथे कायमस्वरूपी प्रदर्शनं मांडली आहेत. होळीचा आणि दिवाळीचा दुसरा दिवस असे दोन दिवस सोडले तर वर्षातले सर्व दिवस सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे विज्ञान केंद्र खुलं असतं. विज्ञान केंद्रात गेल्या दशकभरात काही सुधारणा करून ते अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला गेला. प्रत्येक प्रदर्शनात तुम्ही गेलात की, तुम्हाला तिथं ठेवलेल्या यंत्राविषयी किंवा साधनांविषयीची माहिती ऐकता येते आणि त्याचवेळी वाचताही येते. इथे मुलांच्या नवकल्पनांना वाव देण्यासाठी इनोव्हेशन हब तयार करण्यात आलं आहे. यात रोबोची जुळणी, विज्ञान कीटसारख्या सुविधा मुलांना दिल्या जातात.

अधिक माहितीसाठी संपर्क : ८४९३२६६७.



Σ $E = mc^2$ Ω ❖❖❖

१. दिवसभर पळत राहतो;
पण जागा कधी सोडत नाही,
सर्वांना हवा देतो;
पण स्वत: कधी घेत नाही.

२. उंच आकाशी पाण्याचा माठ
शेंडीचं त्यावर आवरण दाट

३. हात आहेत पण हालत नाही
पाय आहेत पण चालत नाही
माझी पाठ पण तुमचाच आधार
माझ्यामुळे तुम्हास मिळतो आराम

४. दोन भाऊ एकाच रंगाचे
खूप घनिष्ठ नाते त्यांचे

५. मोठ्या काळ्या टोपलीत
चांदीची नाणी चमचमती

उत्तरे इतरत्र

६. एका काठीची एक कहाणी
ज्यात लपलयं गोड पाणी

दुर्भावनेचा त्याग करुन गुरमत मजबूत करा

ज्यावेळी आपण नवीन घरात प्रवेश करतो त्यावेळी जुन्या घरातील निकामी वस्तू तिथेच सोडून देतो. आता आपण नव्या घरात प्रवेश केला आहे. आपल्या ज्या चांगल्या वस्तू आहेत ज्या नीटनेटक्या आहेत त्या बरोबर घेऊन जाऊन काही नवीन वस्तू खरेदी करु. अशाप्रकारे कचऱ्याच्या स्वरुपात आपल्यामध्ये वाईट भावना, क्रोध, मोह, अहंकार आहे. ही सुध्दा तीच सामुग्री आहे, जी या नव्या वर्षाला सोबत न्यायची नाही. जे मागील वर्ष निघून गेले त्याचा इतिहास होऊन राहील. प्रेम, नम्रता, विशालता, सहनशीलता, दया, करुणा, धैर्य, संतोष हे आपल्या बरोबर असतील. येणाऱ्या प्रत्येक दिवशी गुरमत मजबूत होत जाईल.

नव्या वर्षात हीच प्रार्थना आहे की, जे ज्ञानवान महापुरुष आहेत, दातार कृपा करो प्रत्येकात जे दिव्य गुण आहेत ते वृध्दिंगत होवोत, कारण वर्ष जेव्हा संपले तेव्हा आनंदाचा अनुभव करु, इथे केवळ नामधारी ज्ञानी नाहीत. ज्ञानी महापुरुष यांची गुणवत्ता जी आहे ती दिव्य गुण संपन्न आहे. अशाप्रकारे हे संपूर्ण जगालासुध्दा वरदान ठरतील अशी शुभकामना करुया.

हसा मुलांनो हसा

ड्रायव्हर :- मालक,या रस्त्याने आपण गेलो तर आपल्याला टोल भरावा लागेल.
मालक :- असं कर, हा टेलिफोन नंबर तुझ्याकडे लिहून ठेव.
ड्रायव्हर :- तो कशासाठी ?
मालक :- अरे, हा नंबर टोल फ्री आहे.

गंगाकाकू :- सोन्या तू यावेळी बारीक केस का कापून घेतलेस ?
सोन्या :- तू केस कापायला ५०रु दिलेस मी नेहमीप्रमाणे त्या सलूनवाल्याला २५ रु मला द्यायला सुट्टे पैसे नव्हते, म्हणून मग मीच त्याला म्हटले की पैसे राहूदेत उरलेल्या २५ रुपयाचे पुन्हा केस काप

न्यायाधीश :- (चोराला) तुझ्याकडे औषधाला पैसे नव्हते म्हणून तू औषधं चोरलेस पण डॉक्टरांचं घड्याळ का चोरलंस ?
चोर :- औषध किती वाजता प्यायचे हे समजावं म्हणून !

सोन्या :- काय रे दुर्बिण घेऊन कुठं चाललास ?
मन्या :- माझ्या आत्याची तब्बेत बरी नाहीये. तिला बघायला जातो आहे.
सोन्या :- मग ही दुर्बिण कशाला ?
मन्या :- अरे, ती माझी दूरची आत्या आहे ना !

शिक्षक :- पुढच्या आठवड्यात वार्षिक परीक्षा सुरू होतेय, पेपर छापायला दिलेत. नीट अभ्यास करा. कोणाला काही विचारयाचे असेल तर विचारा.
पिंट्या :- सर, पेपर कुठे छापायला दिलेत तेवढं सांगा.

गण्या :- डॉक्टर मला बर्डफ्लू झाला आहे असं वाटतय !
डॉक्टर :- कशावरुन ?
गण्या :- सकाळपासून मला ना हवते उडायची इच्छा होतेय.

वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न :- अन्न साखळी कशाला म्हणतात ?

उत्तर :- वनस्पती दिवसा सूर्यप्रकाशाच्या मदतीने स्वत:चे अन्न तयार करतात. स्वत:चे अन्न स्वत: उत्पादन करीत असल्याने त्यांना उत्पादक म्हणतात. सूक्ष्म जंतू, कीटक, पक्षी, प्राणी, माणसे इत्यादी. सर्व सजीव स्वत:चे अन्न निर्माण करु शकत नाहीत. अन्नासाठी ते वनस्पतीवर अवलंबून असतात. त्यामुळे त्यांना भक्षक म्हणतात. अन्नासाठी केवळ वनस्पतीवरच अवलंबून असणाऱ्या सजीवांना तृणभक्षक किंवा प्राथमिक भक्षक. प्राण्यांना खाणारे 'मांसाहारी' किंवा 'द्वितीय भक्षक' म्हणून ओळखले जातात. तर द्वितिय भक्षकांना खाणाऱ्या प्राण्यांना 'तृतीय भक्षक' म्हणतात. सजीवांच्या मृत अवशेषांवर जगणारे सूक्ष्मजीव हे अपघटक होत. हे सूक्ष्मजीव जंतू जैव घटक मृत पावल्यानंतर त्यांच्या शरीराचे विघटक म्हणून काम करतात. विघटनातून निर्माण झालेली द्रव्ये पाण्यात विरघळतात व पाण्याबरोबर जमिनीत मिसळतात. ही द्रव्ये वनस्पती मुळावाटे शोषून घेतात. अशा प्रकारे अन्नाचा प्रवास एका घटकातून दुसऱ्या घटकाकडे जात शेवटी पुन्हा पहिल्या उत्पादकापर्यंत होतो. या अन्नचक्रालाच अन्नसाखळी म्हणतात.

प्रश्न:- अळूच्या पानांची भाजी खाताना घसा का खवखवतो ?

उत्तर :- अळूच्या पानात कॅल्शियम ऑक्झॅलेटचे स्फटिक असतात. त्यांचा आकार पाकिटासारखा असतो व त्याची टोके सुरीसारखी तीक्ष्ण असतात. भाजी गिळताना हे स्फटिक घशाला आतून घासले जातात व त्यामुळे आपला घसा खवखवतो.

प्रश्न :- डोळ्यांमध्ये अश्रू का येतात ?

उत्तर :- आपल्या डोळ्याच्या कडाखाली अश्रुग्रंथी असतात. त्यामध्ये अश्रू तयार होऊन नलिकाद्वारे ते डोळ्यांच्या वरच्या भागाकडे नेल्या जातात. डोळ्यांच्या प्रत्येक उघड झापेच्या वेळी थोड्याप्रमाणात अश्रू तयार होऊन त्यामुळे डोळा ओला ठेवला जातो. दु:खाच्या वेळी जास्त अश्रू तयार होऊन ते पाझरतात. तसेच जास्त हसल्याने चेहऱ्याच्या स्नायूंना ताण पडतो. स्नायुंच्या आकुंचनामुळे अश्रू बाहेर पडतात. कांदा चिरताना किंवा धुरामुळेसुध्दा डोळ्याच्या आवरणाचा दाह होतो त्यावेळी डोळ्यात अश्रू येतात. एकदंरीत डोळा हा नाजूक अवयव असल्यामुळे त्याचे सर्वतोपरी अश्रूंमुळे संरक्षण होते.

समर्थ दर्शन : भाग - ६४

समर्थांची लीला

एके दिवशी समर्थ चाफळला असताना शिवराय दर्शनाला आले आणि समर्थांशी बोलत बसले होते. इतक्यात एकाएकी समर्थांची स्वारी वस्त्रासह भिजून चिंब झाली. समर्थांनी दोनचार वेळा नेत्र झाकले व उघडले. तेव्हा शिवरायांनी 'हा प्रकार काय आहे?' म्हणून विचारले. समर्थांनी राजांना जवळ बोलावले आणि वस्त्राचे एक टोक पिळून त्याचे थोडेसे पाणी त्यांच्या हातावर घालून ते त्यांना चाखायला सांगितले. राजांनी ते चाखून पाहिले, एकदम खारट. त्यावरुन ते समुद्राचं पाणी आहे असे राजांनी ताडले व ह्या चमत्कारविषयी आपली उत्कंठा दाखवली. समर्थांनी सांगितले, "पंधरा दिवसांनी आपोआपच हकीकत समजेल."

ह्या गोष्टीला पंधरा दिवस गेल्यानंतर पुन्हा राजे नित्याप्रमाणे समर्थांच्या दर्शनाला आले. थोडा वेळ गेला नाही तोच राजापूरचे मुंजे या नावाचे सावकार समर्थांच्या दर्शनाला आले व सर्व मंडळींसह साष्टांग नमस्कार करुन बसले. नंतर मुंजे म्हणाले,"आज पंधरा दिवस झाले, आमचं गलबत समुद्रातील वादळात सापडून अगदी बुडण्याच्या बेतात आलं होतं. कोणताही उपाय

राहीला नाही. मीही स्वतः त्याच्यावर होतो, तेव्हा त्या संकटातून पार पडण्याकरिता कोणताच उपाय सुचेना. रामदास स्वामींची अद्भूत कीर्ती व सामर्थ्य ऐकत होतो. म्हणून त्यांनाच शरण जावे, असे मनात येऊन प्रार्थना केली, की समर्थांनी मला या संकटातून मुक्त करुन जीवनदान द्यावे. मी घरी पोचताच सहकुटुंब सहपरिवार दर्शनाला येऊन यथाशक्ती पूजन करीन. अशी प्रार्थना करताच हीच मूर्ती गलबताखाली प्रकट झाली आणि आपल्या हाताने गलबत धरून त्यांनी आमचं गलबत बंदरास लावलं व ती मूर्ती आकाशात गुप्त झाली. त्याकरिता मी आपल्या पायांचं दर्शन घेण्याकरिता आलो आहे."

हा वृतांत कळताच राजांसह साऱ्या मंडळींना आश्चर्य वाटले. नंतर मुंजेंनी समर्थांची महापूजा केली. वस्त्र आभूषणे अर्पण केली. तो समारंभ आटोपल्यानंतर राजे आपल्या ठिकाणी गेले व मुंजेही अनुग्रह प्रसाद वगैरे घेऊन राजापूरास गेले.

समर्थांजवळ शिष्यमंडळी खूप होती. एके दिवशी त्यांची परीक्षा पाहाण्याचे समर्थांच्या मनात आले.

रात्री निजताना शिवाजीमहाराजांनी अर्पण केलेली भवानी तलवार ते उशाशी ठेवीत असत. त्या दिवशी समर्थ सकाळीच उठले आणि कपाळास मोठा थोरला कुंकुवाचा मळवट भरुन, जटा मोकळ्या सोडून, हातात तलवार घेऊन,"मारतो, तोडतो" असे म्हणत म्हणत, रागाने अंगावर धावून जाऊ लागले. डोळे गरागरा फिरवीत मठातून बाहेर पडले. हा प्रकार पाहून सर्व मंडळी धूम पळत सुटली. कोणी खोलीत दार लावून लपून बसले. कोणी छपरावर चढून बसले. समर्थ मात्र तसेच तलवार हातात घेऊन पळत पळत डोंगरामध्ये निघून गेले.

कल्याणस्वामी मठात नव्हते, ते दुसऱ्या गावात गेले होते. बाकीच्या सर्व मंडळींना वाटले की स्वामींना वेड लागले आहे. थोडीशी मंडळी शोध करीत गेली; परंतु समर्थांनी त्यांना दगड मारुन हाकलून लावले. ह्याप्रमाणे तीन दिवस गेले. सर्व मंडळी चिंताक्रांत झाली. अशा स्थितीत कल्याणस्वामी येऊन पोचले. सर्वांनी त्यांना स्वामींना वेड लागले असून ते रानात निघून गेले असे सांगितले. ते ऐकून कल्याणस्वामी हसले आणि म्हणाले, "स्वामींना वेड लागायचे लांबच राहिले; पण तुम्हाला वेड लागले आहे खरे."

क्रमशः ...

क्षमस्व

जानेवारी २०२० च्या अंकात 'विचारपुष्प' (पान क्र.१२ व १३) या सदरात मुद्रणदोषामुळे 'श' हे अक्षर उमटले नाही. त्यामुळे वाचकांची निराशा होणं स्वाभाविक आहे. तरी मायबाप वाचक उदार अंतःकरणाने क्षमा करतील, ही अपेक्षा!



टेडी बेअरची जन्मकथा

मित्रांनो, अलीकडे टेडी बेअर दिन साजरा केला जातो. खेळण्याच्या दुकानात गेलं की गुबगुबीत टेडी बेअर आपलं लक्ष वेधून घेतोच, टेडी अनेकांचा जिवाभावाचा मित्रच असतो. गोंडस असा टेडी बेअर पहिल्यांदा कोणी तयार केला, हे तुम्हाला ठाऊक आहे का? अमेरिकन राष्ट्राध्यक्षाच्या शिकारी दरम्यान घडलेल्या एका प्रसंगावर टीका करण्यासाठी व्यंगचित्रकाराने काढलेल्या चित्रातून हा टेडी बेअर जन्मला आहे.

ही नोव्हेंबर १९०२ ची गोष्ट आहे. राष्ट्राध्यक्ष थिओडर रुझवेल्ट, मिसिसिपी आणि ल्युशिआना प्रांतातील सीमावादावर तोडगा काढण्यासाठी आले होते. फावल्या वेळात रुझवेल्ट शिकारीसाठी निघाले; परंतु खूप वेळ पायपीट करुनही सावज काही सापडेना. तेव्हा राष्ट्राध्यक्षांचा उत्साह मावळत चालल्याचं पाहून त्यांच्या सहकाऱ्यांनी धावपळ करुन ल्युशिआनात सापडणाऱ्या काळ्या अस्वलाच्या पिल्लाला पकडून आणलं आणि झाडाला बांधून राष्ट्राध्यक्षांना त्याची शिकार करण्यास सांगितले. पण रुझवेल्टयांना ते मुळीच आवडलं नाही. त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना अस्वलाला सोडण्यास सांगितलं. जेव्हा ही हकिकत सगळीकडे पसरली, त्यावेळी 'वॉशिंग्टन पोस्ट' या

वृत्तपत्रातील व्यंगचित्रकार क्लिफर्ड बेरीमॅनने या प्रसंगावर एक व्यंगचित्र चितारलं. कर्मचाऱ्यांनी अस्वलाच्या पिल्लाला दोरीने धरुन ठेवलंय आणि रुझवेल्ट त्याला मारण्यास नकार देतायत. या व्यंगचित्राला अमेरिकेत तुफान पसंती मिळाली.

ब्रुकलीनमध्ये खेळण्याचं दुकान चालवणारा मॉरीस मिकटॉमसुध्दा या व्यंगचित्राने खूपच प्रभावित झाला. खास करुन दाखवण्यात आलेल्या अस्वलाच्या पिल्लाला पाहून त्याने तातडीने अशा पिल्लाची प्रतिकृती तयार केली. त्यात भुसा भरला आणि दुकानाच्या दर्शनी भागात तो ठेवून त्याबाजूला व्यंगचित्रही ठेवलं. शेकडो ग्राहकांनी ते पिल्लू पाहिलं आणि ते विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना टेडी या नावानेही ओळखले जाई. त्यामुळे मिकटॉमने त्याचं नाव टेडीज् बेअर असे ठेवलं आणि ते तयार करण्यासाठी रितसर रुझवेल्ट यांच्याकडे परवानगीही मागितली. खुल्या दिलाच्या रुझवेल्ट यांनी त्याला मंजुरीही दिली. लोकांमध्ये टेडीज् बेअर लोकप्रिय झाला. निरागसपणाची आणि बालपणीची आठवण म्हणून टेडी बेअर थोड्याच वेळात प्रत्येक मुलाच्या हातात दिसू लागला.

असा एका व्यंगचित्रातून जन्माला आलेला टेडी बेअर, आज जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन विसावला आहे.

- आयुष्यातील छोटेछोटे क्षण महत्त्वाचे असतात, तेच क्षण गोळा करावेत.
- बोलण्यापूर्वी विचार करावा.
- नेहमी नव-नव्या गोष्टी शिकाव्या. आयुष्यात चैतन्य निर्माण होईल.
- आपली आवड काय आहे हे शोधावे आणि ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.
- कुठलीही अपेक्षा न ठेवता शेजारी, मित्रमैत्रिणींना मदत करावी.
- छोटेसे का होईना, एखादे ध्येय निश्चित करावे.
- इतरांसाठीही कधीतरी बोलावे. तेवढंच आपल्या मनाला बरं वाटतं
- स्वत:साठी थोडासा वेळ काढावा. वर्षातून एखादी सुट्टी स्वत:साठी घ्यावी.
- वर्तमान काळात राहण्याचा प्रयत्न करावा. तरच आपला भविष्यकाळ सुखद असेल.
- आपला वेळ, वस्तू इतरांना द्यायला शिकावे.

किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा



किट्टी, तू मोबाईल न्यायचा नाही. खूप महागडा मोबाईल आहे. तू कुठेतरी हरवशील.
नाही ग आई, असं नाही होणार. मी तुझा मोबाईल नेणार म्हणजे नेणार.
नाईलाजास्तव आईने तिला मोबाईल दिला

पाचगणीला माकडं पाहून किट्टीला खूप आनंद झाला. ती मोबाईलवर माकडांचे फोटो काढू लागली.
तेवढ्यात पाठीमागून एक मोठे माकड आले आणि त्याने किट्टीच्या हातातला मोबाईल हिसकावून घेतला.
माकडाच्या हिसक्यामुळे किट्टी धपकन पडली. तिला बराच मार ही लागला. निघताना तिला आईने सांगितलेली गोष्ट आठवली.

सहलीवरुन परत आल्यावर किट्टी घरी आली, तिने सारी हकीकत आईला सांगून तिची माफी मागितली.
बेटा मोबाईल गेला तर जाऊ दे. पण तुला बघ किती लागलं. जास्त दुखापत झाली असती तर ? म्हणून मोठी माणसं सांगतात ते ऐकावं.
किट्टी आईला मिठी मारत म्हणाली, आई तुझं बरोबर आहे. मी चुकले. यापुढे मी कधीच चुकणार नाही. मोठ्या माणसांचं - शिक्षकांचं नेहमी ऐकत जाईन.

वैद्याची पारख

जनक राजाच्या राजवैद्यांना सहायक वैद्याची गरज होती. त्यांनी त्याबाबत जनक राजाला कळविले. जनक राजाने दोन नवोदित वैद्यांना राजवैद्याकडे पाठविले व त्यातून एकाची निवड करायला सांगितले. राजवैद्यांनी दोघांना काही पदार्थ दिले व त्यापासून एक उपयुक्त औषध दुसऱ्या दिवशी बनवून आणण्यास सांगितले; परंतु घरी जाताना राजमार्गाने जावे अशी सूचनाही राजवैद्यांनी दोघांना केली. त्याप्रमाणे ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशी दोघेही तरुण राजदरबारात परतले. त्यापैकी एकाने दिलेल्या पदार्थातून उत्तम औषध तयार करुन आणले होते तर दुसरा रिकाम्या हाताने परतला होता. राजवैद्यांनी त्याला त्याचे कारण विचारले. त्यावर तो म्हणाला, "काल मी राजमार्गाने जात होतो वाटेत एका झाडाखाली एक आजारी माणूस बेशुध्द अवस्थेत पडला होता. काल रात्रभर त्याच्या शुश्रुषेत वेळ गेल्यामुळे औषध तयार करता आले नाही."

राजवैद्यांनी त्याला आपला सहायक म्हणून नेमले. ते पाहून राजाला नवल वाटले. तो राजवैद्यांना म्हणाला, "आपल्या आज्ञेचं उल्लंघन

(पान ४४ वर)



देवाचं अस्तित्व

मणिकपूर नावाचं एक लहानसं गाव होतं. त्या गावात रसिकलाल नावाचा एक सावकार राहत होता. तो जरी सावकार असला तरी आपल्या सावकारीचा त्याला गर्व नव्हता. तो गावातील सर्व लोकांशी प्रेमाने वागत असे. लोकांच्या अडीनडीला सर्व प्रकारची मदतही करत असे. परमेश्वरावर त्याची नितांत श्रध्दा होती. आजूबाजूच्या गावात कुठेही कथा कीर्तन असले तर सावकार तिथे आर्वजून जात असे आणि त्याचा लाभ घेई. त्यामुळे देवावर त्याचा पूर्ण भरवसा होता.

त्याच गावात पांडू नावाचा न्हावी राहत होता. तो नियमित सावकाराच्या वाड्यावर जाऊन त्याची दाढी केस कापायचा. केस कापताना किंवा दाढी करताना पांडू गावातील काहीना काही घडामोडी तसेच इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी बोलत राहायचा. सावकार त्याच्याकडे कानाडोळा करायचा. बोलता बोलता एके दिवशी तो सहज बोलून गेला,"देव अस्तित्वातच नाही, ती एक कल्पना आहे."

दाढी करुन झाल्यानंतर सावकार म्हणाला, "देव नाही असं तू का म्हणतोस ?"

त्यावर पांडू म्हणाला, "जर देव असता तर

जगात एवढी दु:खी कष्टी, त्रासलेली माणसं दिसली नसती. सर्वजण सुखात राहिले असते. कोणालाच कसलं दु:ख आलं नसतं."

खरं तर सावकार त्याच्याशी वाद घालणे टाळत असे; परंतु विषय देवाच्या अस्तित्वाचा आल्यामुळे सावकार त्या शब्दावर मनोमन विचार करु लागला. इतक्यात त्याचा नोकर काहीतरी विचारायला समोर आला, त्याचे केस दाढी खूपच वाढलेली होती. सावकार पांडूला म्हणाले, "पांडू जगात केस दाढी करणाऱ्या न्हाव्यांचं अस्तित्वच राहिले नाही रे!"

त्यावर पांडू म्हणाला," शेटजी तुम्ही असं काय म्हणता? अहो, मी आताच नाही का तुमची दाढी केली?" त्यावर सावकार म्हणाले, "जर तुमचं खरोखरच अस्तित्व असतं तर जगात असे केसांचे झाप वाढवणारे, लांब लांब दाढी वाढवणारे यांचंही अस्तित्व समाप्त झालं असतं."

त्यावर पांडू म्हणाला, "यात माझा काय दोष? जर माझ्याकडे कोणी दाढी, केस कापायला आलंच नाही तर त्याला मी काय करणार?"

सावकार म्हणाला "अगदी बरोबर बोललास!" तो पुढे पांडूला उद्देशून म्हणाला "तुझ्याप्रमाणे देवाचंही अस्तित्व आहे; पण लोकच त्याच्याकडे मदत मागायला जात नाहीत, त्याला शरण जात नाहीत म्हणून त्यांना दु:ख यातना भोगाव्या लागतात. हे ऐकताच पांडू वरमला आणि देवाचं अस्तित्व मान्य केलं."

तात्पर्य : परमेश्वर सर्वांचा पिता आहे; परंतु त्याला आपलंसं केलं तरच तो आपले जीवन आनंदाने भरु शकतो.

❖❖❖

वैद्याची पारख (पान ४२ वरुन)

करणाऱ्याला आपण सहाय्यक म्हणून का निवडलं?" राजवैद्य म्हणाले "महाराज दोघंही एकाच मार्गानं गेले होते, एकाने आजारी माणसाला पाहिलं तर दुसऱ्यानं त्याच्याकडे दुर्लक्ष केले. औषध बनवणं फारसे कठीण नव्हतं; परंतु वैद्य म्हटलं, की त्याचं कर्तव्य काय असतं हे त्याने जाणलं पाहिजे म्हणून दोघांपैकी कोण मानवसेवा करण्यास समर्थ आहे हे मला पाहायचं होते. माणसाचा आजार औषधापेक्षा वैद्याच्या स्नेहाने व सेवेने बरा होतो. त्यासाठी मी निवडलेला तरुण योग्य आहे."

❖❖❖

ओळखा पाहू - उत्तरे

१.पंखा
२.नारळ
३.खुर्ची
४.बूट/सॉक्स
५.चांदण्या
६.ऊस

सामान्य ज्ञान

१. 'राष्ट्रीय विज्ञान दिन' हा दिवस कोणत्या शास्त्रज्ञाने केलेल्या शोधनिबंधामुळे साजरा केला जातो ?
अ) एडिसन ब) सी.व्ही.रामन क)न्यूटन ड)डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम

२. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन केव्हा साजरा केला जातो ?
अ) २१ फेब्रुवारी ब) २३ फेब्रुवारी क)२५ फेब्रुवारी ड)२७ फेब्रुवारी

३. चारमिनार ही वास्तू कोणत्या शहरात आहे ?
अ) दिल्ली ब) आग्रा क) हैद्राबाद ड) औरंगाबाद

४. 'अग्निपंख' या पुस्तकाचे लेखक कोण ?
अ) बाबा आमटे ब) डॉ. जगदिशचंद्र क)डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ड)वि.स.खांडेकर

५.खालीलपैकी कोणते पात्र रामायणातील नाही ?
अ) लव-कुश ब) जरासंध क) मारीच ड) जटायू

६. जगातील सर्वात तरुण महिला पंतप्रधान सना मरीन (वय ३४ वर्षे) या कोणत्या देशातील आहेत ?
अ) फिनलँड ब) क्युबा क) इजिप्त ड)फ्रांस

७. महाराष्ट्र राज्यात कोणत्या तेलबियांचे पीक कोरडवाहू शेतीत घेतले जाते ?
अ)सूर्यफूल ब) जवस क) मोहरी ड)करडई

८. प्लास्टर ऑफ पॅरिस कशापासून बनवतात ?
अ) मोरचूद ब) बॉक्साइट क)जिप्सम ड) धुण्याचा सोडा

९. महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात एकही तालुका नाही ?
अ) मुंबई शहर ब)मुंबई उपनगर क) ठाणे ड)पालघर

१०. संजीवनी ही औषधी वनस्पती आणण्यासाठी हनुमंताने कोणता पर्वत उचलून आणला ?
अ) निलगिरी ब)मेरू क)महेंद्र ड) द्रोणागिरी

उत्तरे इतरत्र

मुंबई शहर व मुंबई उपनगर

मुंबई जिल्हा हा महाराष्ट्रातील प्रगत जिल्हा असून क्षेत्रफळ ६७.७९ चौ.कि.मी. आहे. मुंबई जिल्हा म्हणजेच मुंबई शहर. मुंबई शहर हे मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा या जिल्ह्यात विभागले गेले आहे. मुंबई जिल्ह्याची हद्द कुलाब्यापासून शीव/माहिम पर्यंत आहे.

मुंबई उपनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यातील दुसरा सर्वात लहान (क्षेत्रफळानुसार) जिल्हा आहे. याचे प्रशासकीय केंद्र वांद्रे पूर्व येथे आहे. मुंबई शहर हे मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा मिळून तयार होते. म्हणजेच मुंबई उपनगर जिल्हा हा बृहन्मुंबई महापालिकेच्या प्रशासनाच्या अखत्यारीत येतो.

मुंबई उपनगर जिल्ह्यात कुर्ला तालुका, बोरीवली तालुका व अंधेरी तालुका हे तालुके आहेत. बोरीवली हा जिल्हा महाराष्ट्रातील प्रगत जिल्ह्यांपैकी असून त्याचा या बाबातीत दुसरा क्रमांक लागतो. मिठी नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे.

मुंबई ही भारतातल्या महाराष्ट्र राज्याची राजधानी असून भारतातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. हे शहर महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर वसले आहे. मुंबई हे भारतातील व दक्षिण, पश्चिम आणि मध्य

आशियातील सर्वांत जास्त वार्षिक उत्पन्न असलेले शहर आहे. आपल्या उपनगरांसह मुंबई जगातील ५वे सर्वांत मोठे शहर आहे. मुंबई शहराला नैसर्गिक बंदर लाभले असून या बंदरातून भारताची सागरी मार्गाने होणारी मालवाहतूक होते.

मुंबई १८व्या शतकाच्या मध्यकाळात ब्रिटिशांनी मुंबई ही कुलाबा, लहान कुलाबा, माहीम, माझगाव, परळ, वरळी आणि मलबार हिल ह्या सात बेटांचे एकत्रीकरणाने बनवली. १९व्या शतकात मुंबईची आर्थिक व शैक्षणिक प्रगती झाली आणि २०व्या शतकामध्ये स्वातंत्र्य चळवळीचा पाया मुंबईतच मजबूत झाला. इ.स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळताना मुंबई शहर हे ब्रिटिशांनी बनवलेल्या मुंबई इलाख्यातच राहिले. इ.स.१९६० साली संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली व मुंबई महाराष्ट्र राज्याची राजधानी बनली.

१९९५ मध्ये या शहराचे बॉंबे हे अधिकृत नाव बदलून मुंबई करण्यात आले.

मुंबई ही भारताची आर्थिक व मनोरंजनाची राजधानी आहे. रिझर्व बँक, मुंबई शेअर बाजार, राष्ट्रीय शेअर बाजार या महत्त्वाच्या आर्थिक संस्था या शहरात आहेत. मुंबईत अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये आहेत. येथे व्यवसाय व नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने देशाच्या इतर भागातून मोठ्या प्रमाणात लोक मुंबईत येतात.

मुंबई हे बॉलीवूड व मराठी उद्योगाचे केंद्र आहे. बोरीवली नॅशनल पार्क किंवा कृष्णगिरी राष्ट्रीय उद्यान म्हणून ओळखले जाणारे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे मुंबईच्या हद्दीतच आहे.

मंत्रालय, विधानभवन, ऑगस्ट क्रांती मैदान, सहार व सांताक्रूझ विमानतळ, ब्रेबॉन व वानखेडे स्टेडियम, भाभा अणुसंशोधन केंद्र, गोरेगाव येथील फिल्म सिटी हा स्टुडिओ, ट्रोम्बे (तुर्भे) तेलशुद्धीकरण कारखाना, 'बॉम्बे हाय' खनिज तेलाची विहीर, ओबेरॉय व ताजमहल सारखी पंचतारांकित हॉटेल्स, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, महात्मा फुले मंडई(क्रॉफर्ड मार्केट), जिजामाता उद्यान(राणीचा बाग), प्राणिसंग्रहालय, रेस कोर्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाधी चैत्यभूमी व त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारले जाणार आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय विमानतळ हे जगातील उत्कृष्ट विमानतळांपैकी एक आहे. मुंबई शहरात मेट्रो व मोनो रेल्वेचे जाळे आता पसरु लागले आहे.

प्रेक्षणीय स्थळे :- महालक्ष्मी मंदिर, मुंबादेवी, चैत्यभूमी, माउंट मेरी चर्च , हाजी अली दर्गा, फ्लोरा फाउंटन, हँगिंग गार्डन, गेट वे ऑफ इंडिया, जिजामाता उद्यान, राजाबाई टॉवर, कमला नेहरु पार्क, डेव्हीड ससून ग्रंथालय, कान्हेरी गुहा, छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मरीन ड्राईव्ह, घारापुरी द्वीप, ताज महाल पॅलेस अँड टॉवर, ब्रेबॉर्न स्टेडियम, शिवाजी मंदिर नाट्यगृह, शिवाजी पार्क, मलबार हिल, मणिभवन, मुंबई रोखे बाजार, भारतीय रिझर्व्ह बँक, सालशेत, पवई, मुंबई उच्च न्यायालय, वांद्रे-वरळी सागरी महामार्ग, भारतीय तंत्रज्ञान संस्था, वानखेडे स्टेडियम, मुंबई विद्यापीठ, काळा घोडा, चित्रनगरी, मार्वे व मनोरी बीच, जुहू बीच, एस्सेल वर्ल्ड व पॅगोडा विपश्यना केंद्र इ.

❖❖❖

सुसाट टॉनी राजा
(Tawny Rajah)

फेब्रुवारी, मार्च महिना आला की, जंगलं सुनसान होऊन जातात; पण पावसाळ्यानंतरचा हाच काळ फुलपाखरं बघण्याचा सर्वोत्तम काळ असतो. या वेळेस आपल्याला 'चिखलपान' करताना अनेक फुलपाखरं दिसतात. या चिखलपान करणाऱ्या फुलपाखरांच्या जाती अणि त्यांची संख्या खरोखरच विस्मयकारक असते. सुकलेल्या जागेत वा ओलसर चिखलावर स्पॉट स्वॉर्डटेल, कॉमन गल, ईमीग्रंट, झेब्रा ब्लू, लाइन ब्लू, सेलर्स, प्लम जुडी, पेन्सी अशी अनेक फुलपाखरं आआपल्याला दिसतात. यातील एक वैशिष्ट्यपूर्ण फुलपाखराची प्रजात म्हणजे 'राजा'.

या प्रजातीतील 'ब्लॅक राजा' व 'टॉनी राजा' ही 'फुलपाखरं खूप आकर्षक आणि सुंदर दिसतात. यांच वैशिष्ट्य म्हणजे ही फुलपाखरं संपूर्ण वर्षात फक्त याच काळात दिसतात. एका जागी स्वस्थ न बसणारी ही फुलपाखरं भन्नाट वेगात सुसाट उडतानाच दिसतात. प्रचंड वेगाने उडणाऱ्या या फुलपाखरांचं छायाचित्रण करणं म्हणूनच अवघड असत.

या फुलपाखरांची आणखी एक खासियत म्हणजे ती केवळ चिखलाकडेच आकर्षित होत नाहीत, तर अतिपक्व फळं, दारू, प्राण्यांची विष्ठा किंवा मूत्र यांच्याकडेदेखील आकृष्ट होतात आणि फक्त याच वेळेस जमिनीवर उतरतात. इतर वेळी केवळ झाडावर उंच ठिकाणी उडतानाच ती दिसून येतात.

या फुलपाखरांतील 'टॉनी राजा' हे अतिशय देखणं व आकाराने मोठं असं फुलपाखरू आहे. या फुलपाखराच्या पंखाची वरची बाजू उठावदार व पिवळसर-भगव्या रंगाची असते. त्याच्या वरच्या पंखाच्या टोकांना जाड काळी किनार असते. मादी फुलपाखराच्या पंखावर काळ्या किनारीखाली एक पांढरा पट्टा असतो, ज्यामुळे पंखांच्या कडेला झालर असल्याप्रमाणे दिसते. पंखांची खालची बाजू निळसर- पिवळी असते व त्यावर चंदेरी झळाळी असते. पंखांवर बारीक तपकिरी-लालसर रेघांची नक्षी असते. तसंच पंखांच्या टोकाला छान उठावदार शेपट्यासुद्धा असतात. असं हे इतर फुलपाखरांपेक्षा न्यारं रुपडं असलेलं 'टॉनी राजा' फुलपाखरू त्याच्या आकर्षकतेमुळे जास्त लोकप्रिय आहे.

-संग्राहक अंकित जाधव

चित्र काढा आणि रंग भरा

सामान्यज्ञान उत्तरे

१. ब
२. अ
३. क
४. क
५. ब
६. अ
७. ड
८. क
९. अ
१०. ड

९
८
७

१ द्रौ		२ न	र	३ का	सू	४ र
प		र्म		जू		ज
५ दी	६ ना	दा	७ स		८ म	
	शि		९ म	हा	न	दी
१० अ	क	११ ब	र		सा	
ट्ठा		ग		१२ प्र		१३ मुं
वी		१४ दा	दा	सा	हे	ब
१५ स	रो	द		द		ई

॥ तू ही निरंकार ॥

सद्गुरुची जर होईल मर्जी सुख शांती नांदेल घरी । सद्गुरुची जर होईल मर्जी प्रकाशित तव मना करी ।
सद्गुरुची जर होईल मर्जी पंगू पर्वत पार करी । अवतार गुरुमर्जी जर होई अशक्य तेही शक्य करी ।

शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...
लग्न बस्त्याची खास सोय !

अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु को सिर पर राखिये, चलिए आज्ञा माहिं ।
कहैं कबीर ता दास को, तीन लोकों भय नाहिं ।

सत्संग वो वैकुंठ जहा पर देव देविया बसते है ।
आनंद ही आनंद जहा पर सुख ही सुख बरसते है।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019-21
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

॥ तुही निरंकार ॥

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, बिरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स

मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज

मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल

बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन ह्. पाटील
अंकित ज. पाटील

राकेश च. पाटील
कुशल रा. पाटील